**प्रेसनोट दिनांक २९/०५/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**पाहिजे आरोपीचा शोध घेवुन, त्यास गजाआड केले.**

फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री.यशपाल सुर्यवंशी व तपास पथकातील कर्मचारी हे फरासखाना पोलीस स्टेशनचे हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणेचे अनुषंगाने पेट्रोलींग करीत असतांना, पोलीस कर्मचारी दिनेश भांदुर्गे यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, शिवजयंतीचे नावाखाली बिफ मार्केट मधील व्यापा-यांना जबरदस्तीने खंडणी मागणारा व समर्थ पोलीस स्टेशनचे हद्दित गाडया फोडणारा व फ.खाना पोलीस स्टेशन व समर्थ पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयात पाहीजे असलेला पुणे शहर आयुक्तालयाचे रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे प्रविण उर्फ भैय्या प्रताप शिंदे रा. कसबा पेठ पुणे व साहील रजपुत रा.मंगळवार पेठ पुणे हे माई मंगेशकर हॉस्पिटल वारजे माळवाडी पुणे येथे येणार आहेत.

प्राप्त बातमीवरुन मा.वरिष्ठांचे आदेशावरुन नमुद आरोपींना वारजे माळवाडी येथील मुंबई बेंगलोर हायवेलगत असलेल्या माई मंगेशकर हॉस्पिटलजवळ सापळा रचुन शिताफीने पकडुन भैय्या शिंदे यास फरासखाना पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या खंडणीचे गुन्हयात अटक केली असुन साहील रजपुत यास समर्थ पोलीस स्टेशनकडे दाखल असलेल्या गुन्हयात अटक केली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ पुणे श्री.सुहास बावचे, सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग पुणे श्री. प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.किशोर नावंदे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन पुणे, तसेच पोलीस उपनिरीक्षक यशपाल सुर्यवंशी,पोहवा बापु खुटवड, केदार आढाव, पोलीस नाईक दिनेश भांदुर्गे,अमोल सरडे, विकास बो-हाडे, शंकर कुंभार, सयाजी चव्हाण, हर्षल शिंदे, महाविर वलटे, मोहन दळवी, आकाश वाल्मीकी, अमेय रसाळ, मयुर भोकरे यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे